# सरदार मलिक - भाग ३



प्रश्न - तुम्हाला जाणणारे जे रसिक श्रोते आहेत त्यांनी तुमच्याबद्दल काय मत व्यक्त केले तर तुम्हाला आनंद होईल ?

उत्तर - हा संगीतकार मानवजातीवर प्रेम करणारा आणि माणुसकी जपणारा सहृदय गृहस्थ आहे असे कुणी माझ्याबद्दल म्हटले तर मला खूप आवडेल. तुम्ही तुमच्या या मुलाखतीत हे नक्कीच छापून आणा. मी यावर थोडेफार लिखाण देखील केले आहे. मी लिहिलेल्या पुढील ओळी पहा.

बैठा है बारुद की झड मे, अमन-शांति चिल्लाये
अपनीही करनीसे कही ये खुद ना भस्म हो जाये
आओ मिलकर हम इस दुनियाको स्वर्ग बनाये
सब के दुख बाँटे, चलो हम सबकी पीड बाँटे
हम सबके हो, सब अपने हो
क्यू हो अकेले इस दुनियामे हम

एक गोष्ट नक्कीच आहे की सरदार मलिक जर आपल्या पंतप्रधानांना भेटले तर क्षेपणस्त्रांची कार्यवाही लगेचच गुंडाळून ठेवायला सांगतील. तसेच कुठल्याही परिस्थितीत शांतता करारांवर, अजिबात विचार न करता सही करायला सांगतील. आपल्या शेजारच्या राष्ट्रांसोबत सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यावर भर द्यायला सांगतील. सध्याच्या वातावरणात उत्तम प्रकारचे संगीत देण्यासाठी

ते काय आणि कोणत्या कल्पना सुचवतील ते मात्र कळत नाही.

सरदार मलिक यांची गाजलेली पुढील दोन गाणी पहा -
'बहारोंकी दुनिया पुकारे तू आजा' (तलत, आशा/'लैला मजनू')
'देख ली ऐ इश्क तेरी मेहेरबानी देख ली' (तलत, आशा/'लैला मजनू')

'लैला मजनू' या चित्रपटातील इतर गाणी गुलाम मोहंमद यांनी तयार केली. पण सरदार मलिक यांनी त्यांना दिलेले गाणेही ताकदीने तयार केले. खरे तर त्यांनी या चित्रपटासाठी आणखी एक गाणे देखील तयार केले होते, पण ते गाणे त्या चित्रपटातून वगळण्यात आले. परंतु नंतर ते 'चोर बझार' या चित्रपटात वापरण्यात आले. दोन्ही चित्रपटांचे गीतकार एकच होते, ते म्हणजे शकील बदायुनी. दोन्ही चित्रपटांचा नायकही एकच होता, तो म्हणजे शम्मी कपूर. ते गाणे त्यातील अप्रतिम व्हायोलिनच्या साथीने खूपच सुंदर झाले आणि लोकांना ते खूप भावले. ते गाणे म्हणजे 'तेरे दरपे आया हूँ फरियाद लेकर' (तलत-'चोर बझार').

ह्या संगीतकाराच्या हृदयात मेलडीला किती अहम् स्थान आहे ते पुढील गाण्यांवरून कळते.
'ऐ गम-ए-दिल क्या करूँ' (तलत, आशा/'ठोकर)
'मै गरीबोंका दिल हूँ, वतन की झुबान' (हेमंत आणि कोरस/'आब-ए-हयात')
'मेरा दिल मेरी जान चाहे ले ले' (गीता दत्त आणि कोरस/'आब-ए-हयात')
'मेरा जला रातभर दिया' (सुधा/'चमक चाँदनी')

सरदार मलिक यांचे 'सारंगा' या चित्रपटासाठी अतिशय यशस्वी असे योगदान आहे. त्यांनी त्या चित्रपटात एकंदर १४ गाणी ध्वनिमुद्रित केली. त्यांतील काही गाणी पुढीलप्रमाणे -
'सारंगा तेरी याद मे' (मुकेश/'सारंगा')
'हाँ दिवाना हूँ मै' (मुकेश/'सारंगा')
'लागी तुमसे लगन साथी छूटे ना' (लता, मुकेश/'सारंगा')
'पिया कैसे मिलू तुमसे, मेरे पाँव पडी जंजीर' (रफी, लता/'सारंगा')

सरदार मलिक यांनी 'सारंगा' या चित्रपटासाठी नि:संशय सुरेख गाणी दिली, परंतु त्यांनी इतर काही चित्रपटांतही, स्वत:ची गुणवत्ता सिध्द करणारी अतिशय सुरेल गाणी दिली, उदाहरणार्थ ही पुढील दोन गाणी -
'तेरे हम, ओ सनम, तू जहाँ, हम वहाँ' (रफी व सुमन/'बचपन' १९६३)
आणि

’मुझे तुमसे मुहब्बत है, मगर मै’ (रफी/’बचपन’ १९६३)

थोडेसे चित्रपट, थोडीशी गाणी, परंतु सुगंधित आठवणींचा दरवळ कायमच राहील.

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com